# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २४३** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.२८/०२/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी - ११.३० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४२ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.२८/०२/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी - ११.३० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४२ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.२८/०२/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी - ११.३० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४२ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:- २४४** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. विदयुत विभाग प्रमुख, विदयुत विभाग यांचेकडिल जा.क्र./मनपा/विदयुत/४२२/२०२४-२५ दि.२८/०२/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.२५/०२/२०२५ चा अभिप्राय
४. निविदा समितीचा निर्णय
५. आयुक्त यांची मान्यता

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीचे शिवाजी नगर येथील STP Plant येथे सोलर पॅनल सिस्टिम बसविणे बाबत.

---

वाचा क्र.१ व विदयुत विभाग प्रमुख, विदयुत विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीचे शिवाजी नगर येथील STP Plant येथे सोलर पॅनल सिस्टिम बसविणे बाबत आयुक्त, मनपा यांचे दि.१६/०७/२०२४ च्या मान्यतेनूसार ई निविदा सुचना क्र.०१ शासनाचे संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०४ मक्तेदारांच्या ई निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या होत्या. आलेल्या चारही ई-निविदाधारकांचे फोल्डर क्रं.१ उघडले असता त्यात चारही ई-निविदाधारकांनी आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने चारही ई-निविदाधारकांकडुन शॉर्ट फॉलव्दारे कागदपत्रे मागविण्यांत आली असता चार ई-निविदाधारंकापैकी ई-निविदाधारक सिध्देशा ऑरगॅनिक,जळगांव यांनी शॉर्ट फॉलव्दारे मागणी केलेल्या कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे मात्र तिन ई-निविदाधारक यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्याने ते अपात्र ठरले.

ई-निविदा स्पर्धात्मक होणेच्या दृष्टीने सदर कामी आयुक्त यांचे मान्यतेनूसार फेर ई-निविदा सुचना क्रं.०५ शासनाचे संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत एकुण ०३ मक्तेदारांच्या ई निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या होत्या. आलेल्या तिनही ई-निविदाधारकांचे फोल्डर क्रं.१ उघडले असता त्यात ई-निविदाधारकांनी आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने ई-निविदाधारकांकडुन शॉर्ट फॉलव्दारे कागदपत्रे मागविण्यांत आली असता सत्यम इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इंजिनिअर्स,भुसावळ यांनी short Fall व्दारे मागणी केलेल्या कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्याने ते सदर निविदे करीता अपात्र ठरत असून १) शासन निर्णय CAT/२०१७ चे प्र.क्रं.०८/इ.मा.०२ मंत्रालय दि.२७/०९/२०१९, २) शासन निर्णय CAT/२०१७ चे प्र.क्रं.०८/इ.मा.०२ मंत्रालय दि.२०/०५/२०१९ व ३) शासन निर्णय संकिर्ण २०२१/प्र.क्र.९८/नवि-१६ दि.०८ जुलै २०२१ अन्वये चे शासन निर्णयानुसार ई-निविदेत सहभागी ई-निविदाधारक १) इकोस्क्वेअर एनर्जी, सोल्युशन्स,जळगांव २) गीता सोलर सिस्टीम,जळगांव यांनी आवश्यक असलेले कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने ते पात्र ठरत असून दोन्ही पात्र ई निविदाधारक यांचे आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्रं. | ई निविदा धारकाचे नांव | ई-निविदा रक्कम | ई निविदेत आलेले दर | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | इकोस्क्वेअर एनर्जी, सोल्युशन्स,जळगांव | रु.५२,३६,३२६/- | ०.२७०% कमीचे रु.५२,२२,१८८/- | रु.५२,२२,१८८/- |
| २ | गीता सोलर सिस्टीम,जळगांव | | अंदाजीत दराप्रमाणे रु.५२,३६,३२६/- | रु.५२,३६,३२६/- |

वरील तुलनात्मक तकत्यानूसार मक्तेदार इकोस्क्वेअर एनर्जी, सोल्युशन्स,जळगांव यांचे दर सर्वात कमीचे म्हणजेच निविदा रक्कमेपेक्षा ०.२७०% कमीचे आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.५२,२२,१८८/- मात्र इतका

खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., या रकमेचा खालील प्रमाणे समावेश करावयाचा आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | ई निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च Estimate Item No.१ | रु.४३,३९,३९२/- |
| ०२ | १२% GST on Estimate Item No.१ | रु.५,२०,७२७/- |
| ०३ | ई निविदाप्रमाणे अपेक्षीत खर्च Estimate Item No.२ to ११ | रु.८,८२,७९६/- |
| ०४ | GST १८% on Estimate Item No.२ to ११ | रु.१,५८,९०३/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च | रु.५९,०१,८१८/- |

वर नमुद निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.५९,०१,८१८/- मात्र राष्ट्रीय शुध्द हवा निधी अंतर्गत करावयाचा आहे. त्यानुसार लघुत्तम ई निविदाधारक इकोस्क्वेअर एनर्जी, सोल्युशन्स,जळगांव यांचे ई-निविदा रक्कमेपेक्षा ०.२७०% इतके कमीचे दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळणेसाठी विदयुत विभाग प्रमुख, विदयुत विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र. ४३** **(स्थायी समिती)**

---

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:- २४५** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/९४/२०२४-२५ दि.१३/०२/२०२५
३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.२६/०२/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.२७/०२/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२८/०२/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.२८/०२/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे बाबत प्रस्ताव.

---

वाचा क्र.१ व वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

पंप ऑपरेटर यांच्या दि.१७/०२/२०२५ चे मागणीनूसार म.न.पा. वाहनांसाठी डिझेलसाठा ३५२३ लिटर शिल्लक असुन लागणारा शिल्लक डिझेल साठानुसार ४ ते ५ दिवसांसाठी पुरवठा होईल. सबब पंप ऑपरेटर यांनी मागणी क्रं.१४१११ दि.१७/०२/२०२५ अन्वये १२,००० लिटर डिझेलची मागणी केलेली आहे.

दि.०९/०७/२०२२ पासून डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दरात (रेट) फरक असल्याने मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडुन दि.०८/०७/२०२२ पासून किरकोळ डिझेल खरेदी महासभा/स्थायी समितीच्या मान्यतेने सुरु आहे. किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजार भाव) व बल्क दर या दोघामध्ये जो पर्यंत फरक राहील तो पर्यंत बाजार भावातून किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव यांचे दर प्रति लिटर एकुण रक्कम रु.९२.०३ मात्र असुन, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन मनमाड टर्मिनल यांचे ठोक/बल्कचे प्रती लिटरचे दर रक्कम रु.९२.१९ मात्र आहेत.

महासभा ठराव क्रं.१२७० दि.२३/०८/२०२३ अन्वये तसेच स्थायी समितीने वेळावेळी पारीत केलेल्या ठरावानुसार आवश्यकतेप्रमाणे १२००० लिटर्सचा पुरवठा आदेश देवून किरकोळ डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता किरकोळ डिझेल खरेदी करण्यात येत आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना मागील देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार दि.२३/०९/२०२४ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. तसेच मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी. रोडवर असल्याने सदर पंपावरुन म.न.पा. वाहनांसाठी डिझेल घेणे सोईचे होते.

तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात १२००० लिटर डिझेल खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२४-२५/१२ दि.१७/०२/२०२५ अन्वये रक्कम रु.११,०४,३६०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्या कडुन १२००० लिटर किरकोळ डिझेल खरेदी करणेस व या कामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळण्यासाठी वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४३** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:- २४६** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. भांडारपाल, भांडार विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./भांडार/१११/२०२४-२५ दि.१०/०३/२०२५
३. निविदा समितीचा दि.०७/०३/२०२५ चा निर्णय
४. सहाय्यक आयुक्त, भांडार विभाग यांचा दि.२८/०१/२०२५ चा अभिप्राय
५. उपायुक्त (संगणक विभाग) यांचा दि.२७/०१/२०२५ चा अभिप्राय
६. उपायुक्त (भांडार विभाग) यांचा दि.२९/०१/२०२५ चा अभिप्राय
७. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.३०/०१/२०२५ चा अभिप्राय
८. आयुक्त यांचा दि.३०/०१/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** विविध विभागांना संगणक संच पुरवठा करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व भांडारपाल, भांडार विभाग यांचा वाचा क्र. २ ते ८ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिकेच्या विविध विभागात सध्यास्थितीत किती संचाची आवश्यकता आहे याबाबत माहिती उपलब्ध करणेबाबत कळविले होते. त्याअनुषंगाने विविध विभागाची मागणी प्राप्त झाले नंतर Gem portal वर एकुण ४० संगणकांची निविदा क्रमांक Gem/२०२५/बी/५९०८५७८ दि.०७/०२/२०२५ रोजी प्रसिध्द करणेत आली होती.

उपरोक्त निविदेत दिलेल्या मुदतीत एकुण १५ निविदा प्राप्त झाल्या असून सदर निविदाधारक यांचे तांत्रिक कागदपत्रांचा लिफाफा क्र.१ उघडणेत आला असता निविदा समिती यांचे मान्यतेने पात्र ४ निविदाधारकांचा दरांचा लिफाफा क्र.२ उघडले असता त्यांचे दर खालील प्रमाणे प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | ४० संगणकाचे एकुण दर रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | Spectrum Services,Nagpur | २५,८४,८००/- |
| २. | Global Computer, Bhusawal | २५,८८,०८०/- |
| ३. | Shri Jaitai Enterprises, Chandrapur | २५,९०,०००/- |
| ४. | Highstone Techonologies Ptv Ltd Nagpur | २५,९९,२००/- |

उपरोक्त प्रमाणे आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पाहता पुरवठादार L१ Spectrum Services,Nagpur यांचे रक्कम रु.२५,८४,८००/- मात्रचे दर सर्वात कमीचे असल्याने सदरचे दर स्विकृत करणेस तसेच कार्यादेश निर्गमीत करणेस मान्यता मिळणेसाठी भांडारपाल, भांडार विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ८ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**